



विद्यार्थ्यां समवेत तेर येथिल संत गोरोबाकाका मंदिरास भेट




जवाहर महाविद्यालय’ **कुटुंब रंगले काव्यात’** फेम विसभाऊ बापट यांचे मराठी विभागातर्फे स्वागत




मराठी भाषदिन' कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री भगीरथ कुलकर्णी यांच्या समवेत




मराठी भाषादिन' कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे श्री अरविंद जोशी



लोककला’ हलगी महोत्सव’ यामध्ये मराठी विभागाचा सहभाग




गावरान’भाजी महोत्सव, यामध्ये मराठी विभागाचा सहभाग




मतदान लोकजागृती अभियान यामध्ये मराठी विभागाचा सहभाग



मराठी भाषादिना निमित्त कवी कुसुमाग्रज यांना अभिवादन करताना मान्यवर



मराठी भाषादिन या कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना निवेदिका सौ. शोभा बोल्ली




मराठी विभागाच्या वतीने 'काव्यवाचन' या कार्यक्रमामध्ये काव्यवाचन करताना विद्यार्थिनी




जवाहर वार्तापत्र' चे प्रकाशन करताना संस्थेचे सचिव आदरणीय सि. ना. आलुरे गुरुजी




हर घर तिरंगा' अभियानामध्ये मराठी विभागाचा सहभाग



मराठी भाषादिना निमित्त 'पारंपारिक वेशभूषा दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी मराठी विभागाचे प्रा. डॉ. संजय कुलकर्णी व प्रा. डॉ. राजशेखर नळगे



महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर यांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर एम. ओ. यु. बाबत चर्चा करताना प्रा. डॉ. संजय कुलकर्णी




अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' उस्मानाबाद येथे विद्यार्थ्यांसमवेत मराठी विभागाचा समावेश





पारंपारिक वेशभूषा' या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्या समवेत मराठी विभागाचे प्रा. डॉ. संजय कुलकर्णी, प्रा. डॉ. राजशेखर नळगे, प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार



मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री शशिकांत जोशी व प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते विद्यार्थिनीचा गौरव करताना



ग्रंथ प्रदर्शनात ग्रंथाचे निरीक्षण करताना प्राध्यापक व विद्यार्थी



मराठी च्या विद्यार्थ्यांसमवेत प्रा. डॉ. संजय कुलकर्णी व प्रा. डॉ. राजशेखर नळगे



ग्रंथ प्रदर्शनात ग्रंथाचे निरीक्षण करताना प्राध्यापक व विद्यार्थी



मराठी विभागाच्या वतीने वृक्षारोपण करताना




मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, अभिनेते अजय तपकिरे यांच्या समवेत मराठी विभागाचे प्रा. डॉ. संजय कुलकर्णी प्रा. डॉ. राजशेखर नळगे आणि डॉ. अंकुश कदम

## मराठी विभागाचा साहित्य संमेलनात सहभाग



अणदूर दि. ११ जानेवारी : उस्मानाबाद येथे दि. १०, ११ व १२ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जवाहर महाविद्यालय, अणदूर च्या मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थी समवेत सहभाग नोंदविण्यात आला आणि 'साहित्याची वारी, गोरोबांबाच्या घरी' या साहित्य संमेलनाच्या शीर्षकगीताप्रमाणे विद्यार्थ्यांचा तेर येथिल गोरोबाकाका यांच्या समाधी स्थळी भेट देऊन त्यांच्या बद्दल माहिती देण्यात आली. त्यांच्या अंभगाचा परिचय करुन देण्यात आला.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना साहित्य संमेलन कशी असतात याची माहिती व्हावी, साहित्याबद्दलची आवड निमार्ण व्हावी. संमेलनातील विविध उपक्रम, परिसंवाद , कथाकथन, कविकट्टा, ग्रथांलय दालने यांचा परिचय व्हावा म्हणून प्रत्येक उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग नोंदवून त्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. अतिशय आनंदी मनाने आणि उत्साही वातावरणात विद्यार्थ्यांनी संमेलनाचा आनंद लुटला.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या प्ररेणेने व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय कुलकर्णी व डॉ. राजशेखर नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

## जवाहर महाविद्यालयात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



जवाहर महाविद्यालय अणदूर येथे ६ जानेवारी रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले. त्यावेळी त्यांनी बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवन, त्यांचा संघर्ष, "दर्पण" हे पत्रक काढण्याचे उद्दिष्ट्ये आणि त्यांचे विविध भाषेतील प्रभुत्व याविषयी माहिती दिली. या प्रसंगी डॉ. अनिता मुदकन्ना मॅडम यांनी ही कविता सादर करुन मनोगत व्यक्त केले. प्राचार्य उमाकांत चनशेट्टी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, जांभेकर केवळ ३४ वर्षाचे आयुष्य जगले पण या छोट्याशा कालखंडातही जगाने त्यांचे

## मराठी विभागाचा साहित्य संमेलनात सहभाग



अणदूर दि. ११ जानेवारी : उस्मानाबाद येथे दि. १०, ११ व १२ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जवाहर महाविद्यालय, अणदूर च्या मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थी समवेत सहभाग नोंदविण्यात आला आणि 'साहित्याची वारी, गोरोबांबाच्या घरी' या साहित्य संमेलनाच्या शीर्षकगीतप्रमाणे विद्यार्थ्यांचा तेर येथिल गोरोबाकाका यांच्या समाधी स्थळी भेट देऊन त्यांच्या बद्दल माहिती देण्यात आली. त्यांच्या अंभगाचा परिचय करुन देण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना साहित्य संमेलन कशी असतात याची माहिती व्हावी, साहित्याबद्दलची आवड निमार्ण व्हावी. संमेलनातील विविध उपक्रम, परिसंवाद , कथाकथन, कविकट्टा, ग्रथांलय दालने यांचा परिचय व्हावा म्हणून प्रत्येक उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग नोंदवून त्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. अतिशय आनंदी मनाने आणि उत्साही वातावरणात विद्यार्थ्यांनी संमेलनाचा आनंद लुटला.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या प्ररेणेने व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय कुलकर्णी व डॉ. राजशेखर नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

---

वार : शनिवार दिनांक : ०१/०५/२०२१

# 'जवाहर महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन साजरी'

जवाहर महाविद्यायात मराठी राजभाषा दिनानिमीत्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते 'कवी कुसुमाग्रज' यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. संजय कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले, त्यावेळी ते कवी कुसुमाग्रज साहित्य हे श्रेष्ठ साहित्य असून त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस हा आहे. त्यांनी जी कांदबरी, कविता, नाटक, क्षेत्रातील कामगिरी फार उल्लेखनिय आहे, त्यांचे विशाखा हा काव्यसंग्रह व नटसम्राट हे नाटक मराठी साहित्य क्षेत्रात मैलाचा दगड ठरले आहेत. त्यांना सन १९८७ साली ज्ञानपीठ या साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. १९३२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जो काळाराम मंदिरात सत्याग्रह केलेला त्यात कुसुमाग्रजांचा सक्रिय सहभाग होता. या सत्याग्रहातून त्यांच्या मनात क्रांती व सामाजिक जाणीव यांची मुल्य रुजली, पुढील सर्व साहित्यात त्यांचे आपणास प्रतिबिंब दिसते. ते एक




मानवतावादी कवी होते. नाशिक मधील त्यांचे घर हे साहित्यीक तिर्थक्षेत्र झाले होते नाशिक येथे होणाचा यंदाच्या आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जयंत नारळीकर यांनी आपल्या मुलाखतीत बोलताना म्हणाले की, मराठी भाषा समृद्ध व्हायची असेल तर शासकीय परिपत्रक साध्या आणि सोप्या भाषेत निघाली पाहिजे. सोप्या भाषेचा संग्रह निर्माण केला पाहिजे.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी मार्गदर्शन करताना म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी सर्वांनी चळवळ करण्याची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी कथा, कादंबरी, नाटक यांचे वाचन केले पाहिजे. मराठीमधील मान्यवर लेखकांचा परिचय करुन घेतला पाहिजे. साहित्य वाचनातून एक प्रकारचा आनंद व ज्ञान मिळते म्हणून वाचन केले पाहिजे. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. एम.बी. बिराजदार यांनी सूत्रसंचलन केले.

# जवाहर वार्तापत्र

## मराठी भाषा गौरव दिन

जवाहर महाविद्यालयात दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी, उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच 'आनंद नगरी' चे ही आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खाद्यपदार्थाचे स्टॉल लावण्यात आले होते. त्याचे उद्घाटन श्री बाबुराव कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, श्री भगिरथ कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांचा भरघोस आनंद घेतला.

या वर्षाच्या भाषा दिनाचे विशेष वैशिष्टय म्हणजे हे वर्ष पु.ल.देशपांडे व ग.दि. माडगुळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे त्यानिमित्त कविता वाचन, उताऱ्याचे वाचन, म्हणी वाचनाचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मराठी भाषा दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या, प्रसिद्ध निवेदिका व नाट्य समिक्षक श्रीमती शोभा बोल्ली, व श्री. भगिरथ कुलकर्णी संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गो.का. बिच्चे, श्री. बाबुराव कुलकर्णी, व प्राचार्य उमाकांत चनशेट्टी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमा पुजनाने झाले. तद्नंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे







प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले. मनोगतामध्ये प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी यांनी पारंपरिक वेशभूषा का करण्यात आले त्याचे प्रयोजन त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रज, ग.दि.माडगुळकर, पु.ल. देशपांडे यांच्या कवितेचे वाचन केले. त्यानंतर प्रमुख वक्त्या श्रीमती शोभा बोल्ली यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्या म्हणाल्या, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयातून सह्यांची मोहीम राबविली गेली पाहिजे. कांही कवितांचे वाचन करुन त्यांनी त्यातील काव्यसौंदर्य, भावसौंदर्य, नादसौंदर्य, अर्थसौंदर्य सांगितले व जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री भगिरथ कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोपात म्हणाले की, आपल्या महाविद्यालयात महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन झाले. बोली भाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे. मराठीत इतर भाषेतील साहित्य केवळ सात टक्के भाषांतरीत आहे. त्यासाठी दर्जेदार लेखन, वाचन होणे आवश्यक आहे. असे म्हणाले.

या कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. राजशेखर नळगे यांनी मानले. तर सुत्रसंचालन प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठीत नागरिक बंधु-भगिनी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढविली.

# 'लोकसाहित्याचे संकलन ' मराठी विभागाचा उपक्रम

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'मराठी राजभाषा दिन' आणि 'मराठी दिनाचा पंधरवाडा' साजरा करण्यासाठी अणदूर परिसरातील लोकसाहित्याचे संकलन करण्याचे निश्चित करण्यात आले. परिसरामधील जी काही पारंपारिक गीते, विधी गीते, लग्न सोहळ्यातील गीते, बारशाचे गीते, डोहाळ जेवणाची गीते, म्हणी, उखाने जे लोक साहित्य पारंपारिक आणि मौखिक स्वरुपात उपलब्ध आहेत. त्यांचे संकलन करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. त्यामध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आपापल्या गावातील विविध समाजातील सण आणि धार्मिक सोहळ्यातील गीतांचे संकलन ऑडिओ, व्हिडिओ, आणि लिखित स्वरुपात एकत्रित करण्यात आले.

समाजातील जी वयोवृद्ध स्त्री आणि पुरुष आहेत





त्यांच्याकडे ही गीते मौखिक स्वरुपात उपलब्ध आहेत. त्यांच्यानंतर ही गीते आपणास पहावयास किंवा ऐकावयास मिळणार नाहीत.

त्याचे संकलन व्हावे आणि पुढील पिढीला आपली पारंपारिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम आणि गीते कळवीत म्हणून लोकसाहित्याचे संकलन करण्यात आले. आज काल लोक साहित्याबाबत समाजामध्ये काहीही माहिती दिसत नाही समाजामध्ये माहिती व्हावी आणि जागृती व्हावी या उद्देशाने आणि नष्ट होणारे साहित्य संकलित होऊन पुढील पिढ्यानपिढ्या त्या साहित्याचा उपयोग आणि अभ्यास व्हावा, या एका हेतूने मराठी विभागाच्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला . हा उपक्रम करण्यासाठी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. संजय कुलकर्णी व डॉ. राजशेखर नळगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये प्रामुख्याने श्री संतोष चव्हाण, कु. कलावती गुरव, कु. स्नेहा शिंदे, कु. जयश्री शिंदे, कु. प्राजक्ता सदाफुले, कु. सरीना शेख या विद्यार्थ्यांनी सहभाग नोदंविला.

# जवाहर महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन संपन्न



जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदुर येथे कां. सावित्रीबाई फुले स्मृतिदिन संपन्न झाला. रसायनशास्त्र विभाग डॉ. मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी बोलतान डॉ. मल्लिनाथ लंगडे म्हणाले, सावित्रीबाई फुले यांना महात्मा जोतिबा फुले यांनी घरात शिकविले. सावित्रीबाई घरी शिकून तत्कालीन वातावरणात घराच्या बाहेत पडल्या आणि मुलींना शिकवून त्यांच्या जीवनात ज्ञानाची ज्योत पेटविली. आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. सावित्रीबाईचे कार्य उल्लेखनीय आहे . म्हणून त्यांच्या प्रतिमेचे



विनम्र अभिवादन करुन त्यांचा आदर्श घेवू या. [illegible] महाविद्यालयातील सर्व प्राध्यपक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम’

अणदूर । भाषा माणसाला समृद्ध करते म्हणून भाषेला जिवंत ठेवण्याचे कार्य मानवाला करायचे आहे. मराठी भाषा अत्यंत सुंदर आहे. चार हजार भाषा आणि साठ हजार बोलीत मराठी ‘‘माऊली’ म्हणून कार्य करत आहे, असे मत प्रा. डी. एल. भोवाळ यांनी व्यक्त केले. अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाने १ ते १५ जानेवारी या कालावधीत ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. मीना जाधव होत्या. यावेळी डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. अनिता मूदकणा, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. बी. एन. गटलेवार, प्रा. एस. आर. भारती, डॉ. एस. एस. बाड, डॉ. एस. के. कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

# जवाहर महाविद्यालयात काव्यवाचन रंगले

अणदूर, ता. १६ (बातमीदार) : जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाच्या वतीने ता. एक ते १५ जानेवारी या कालावधित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला.

यानिमित्त सोमवारी (ता. १५) काव्यवाचन रंगले. प्राचार्य डॉ. मीना जाधव अध्यक्षस्थानी होत्या. नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डी. एल. भोवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. डॉ. अनिता मूदकणा, प्रा. प्रसन्न कंदले, प्रा. डॉ. बी. एन. गटलेवार, प्रा. एस. आर. भारती, प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. डॉ. एस. के. कुलकर्णी यांच्यासह शिवकन्या ठोंबरे, सागर चव्हाण, दीपाली सावंत, सुषमा नवगिरे, स्वाती बेंद्रे, सरोजा इसाके, दीपाली बनसोडे, श्रीधर चिलगुंडे, ऋषिकेश घोडके, मिथुन राठोड, सोमनाथ माळगे या विद्यार्थ्यांनाही सहभाग घेतला. रेश्मा गायकवाड हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी आभार मानले.

**दिव्य मराठी विशेष** • ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांचे प्रतिपादन, भाषेला अभिजात दर्जावर व्याख्यान

# मराठीवर प्रेम करा, पण इंग्रजीशी वैर करू नका

**प्रतिनिधी** | अणदूर

मराठी समृद्ध भाषा असून तरुण पिढीने संत साहित्य वाचण्याची गरज आहे. आज जगभर इंग्रजीचे महत्त्व असले तरी प्रत्येकाच्या घरी ज्ञानेश्वरी, गाथा व दासबोध याचा अभ्यास झाला पाहिजे. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीचे शुद्धीकरण करून प्रशासकीय दर्जा मिळवून दिला. आपण बहुभाषिक असल्याने मराठी अधिकच समृध्द झाली. मराठीवर नितांत प्रेम करा मात्र इंग्रजीशी वैर करू नका, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी केले.



शनिवारी (दि.२६) जवाहर विद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्त अर्थात कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर येथील ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांचे 'मराठी भाषेस अभिजात दर्जा काळाची गरज', या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे हे होते तर व्यासपीठावर प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, प्रा. राजशेखर माळगे, माजी उपसरपंच सिद्राम नरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. कुलकर्णी यांनी केले तर लिंबाजी सुरवसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजशेखर नळगे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी लातूर येथील प्रा. प्रमोद माने यांनी कविता सादर केली. रामचंद्र आलुरे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

## मराठीच्या ३४ बोलीभाषा

जोशी म्हणाले की, जगात पहिल्या १५ मध्ये मराठी भाषा बोलली जाते. तर मराठीच्या ३४ बोलीभाषा आहेत. अन्न व पाणी यावर त्याची वाणी ठरते. त्यामुळे वेगवेगळ्या भागात मराठीची खास लकब आहे. मराठी भाषेला २५०० वर्षापूर्वीचा इतिहास असून ती प्राकृत म्हणून बोलली जात होती. शुद्ध मराठी बोलण्यासाठी त्यातील इंग्रजीची घुसखोरी थांबवा, असे आवाहन त्यांनी केले.

भारुड, पोवाडा, लावणी यामध्ये फक्त मराठी साहित्यात निर्माण झालेले आहे. मराठी भाषा ही जोरकसपणे बोलणारी भाषा आहे. मराठी भाषा ही ज्ञानाची भाषा आहे. कारण मराठी भाषा बोलणारे बहुभाषिक आहेत. त्या बहुभाषिक बोलण्यामुळे मराठी भाषा श्रेष्ठ ठरते आहे. इतर काही देशांमध्ये एकच एक भाषा बोलली जाते पण भारतात अनेक भाषा बोलल्या जातात. महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिल्यांदा मराठी भाषा ही प्रशासनाची भाषा असावी म्हणून प्रयत्न केले आणि उर्दु मिश्रीत मराठी भाषा शुध्द केली. तसे ते करणारे पाहिले राजे होते. त्याच प्रमाणे श्री. अरविंद जोशी यांनी विविध ग्रामीण भाषेचा, शब्दांचा वापर मराठीमध्ये कसा केला जातो ते उदाहरणासह सांगितले. मराठी भाषा ही प्रत्येकाने जाणीवपूर्वक बोलली पाहिजे. तेंव्हाच मराठी भाषा समृध्द होईल. त्यासाठी सर्व मराठी भाषिका कडून प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाला प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य रमेश ठोंबरे, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. राजशेखर नळगे, श्री. लिंबाजी सुरवसे गुरुजी ,जवाहर महाविद्यालयाचे सर्व जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक बंधू भगिनी विद्यार्थी, विद्यार्थांनी आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजशेखर नळगे यांनी केले.